# THE DEKKHAN AGRICULTURISTS RELIEF (SUITS AND APPLICATIONS) VALIDATION ACT, 1954.

## (Bombay Act No. XXXVIII of 1954.)

## मुंबई दक्षिण शेतकरी साहाय्य (दावें व अर्ज) वैधकरण अधिनियम, १९५४

### अनुक्रमणिका.

प्रारंभिक.


| कलमें. | | पान |
|---|---|---|
| १. | लघुसंज्ञा ... ... ... ... ... ... ... ... | १२१७ |
| २. | अनिर्णित असलेले विवक्षित दावें व अर्ज यांचें वैधकरण ... ... ... | १२१७ |
| ३. | काढून टाकलेले विवक्षित दावें व अर्ज पुन्हा दाखल करणें ... ... ... | १२१८ |
| ४. | विवक्षित अपिलें किंवा फेरतपासणी अर्ज पुन्हा दाखल करून घेणें ... ... | १२१८ |

## सन १९५४ चा मुंबई अधिनियम, क्रमांक ३८*

[ दक्षिण शेतकरी साहाय्य (दावे व अर्ज) वैधकरण अधिनियम, १९५४ ]

[ तारीख १८ मे १९५४ ]

### दक्षिणेंतील शेतकऱ्यांना साहाय्य देण्याबाबत अधिनियम, १८७९, याखालील विवक्षित दावें व कामें वैध ठरविण्याबाबत अधिनियम

ज्याअर्थी, मुंबई कर्जदार शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत अधिनियम, १९४७, कलम ५६, पोट-कलम (१) अन्वयें दक्षिणेंतील शेतकऱ्यांना साहाय्य करण्याबाबत अधिनियम, १८७९ हा, प्रथम, निर्दिष्ट अधिनियम अंमलांत आल्याच्या तारखेपासून तीन वर्षांच्या मुदतीसाठीं विवक्षित कारणांसाठीं पुन्हां अधिनियमित करण्यांत आला होता ;

आणि ज्याअर्थी, अशा रीतीनें पुन्हां अधिनियमित करण्यांत आलेला दक्षिणेंतील शेतकऱ्यांना साहाय्य करण्याबाबत अधिनियम, १८७९, याची मुदत तारीख २६ मे सन १९५० रोजीं संपली ; परंतु ज्या मुदतीसाठीं उक्त अधिनियम पुन्हां अधिनियमित करण्यांत आला होता त्या मुदतीविषयींच्या कांहीं गैरसमजुतीमुळे तारीख २७ मे सन १९५० रोजीं उक्त अधिनियमानुसार विवक्षित दावें व अर्ज न्यायालयांत दाखल करण्यांत आले होते आणि त्यांपैकीं कांहीं दावें व अर्ज उक्त अधिनियमाची मुदत संपल्यानंतर दाखल करण्यांत आले या मुद्यावर न्यायमूर्तींनीं काढून टाकले आहेत व इतर दावें व अर्ज न्यायालयांत अनिर्णित आहेत ;

आणि ज्याअर्थी, तारीख २७ मे सन १९५० रोजीं दाखल करण्यांत आलेले असे दावें व अर्ज वैध ठरविणें व न्यायालयांनीं ते निकालांत काढण्याची व्यवस्था करणें आवश्यक व इष्ट आहे ;

त्याअर्थी, याअन्वयें पुढीलप्रमाणें अधिनियम करण्यांत आला आहे :—

१. ह्या अधिनियमास दक्षिण शेतकरी साहाय्य (दावें व अर्ज) वैधकरण अधिनियम, १९५४, असें म्हणावें. लघु संज्ञा.

२. जेव्हां, दक्षिणेंतील शेतकऱ्यांना सहाय्य करण्याबाबत अधिनियम, १९४७, याअन्वयें पुन्हां अधिनियमित करण्यांत आल्याप्रमाणेंचा दक्षिणेंतील शेतकऱ्यांना सहाय्य देण्याबाबत अधिनियम, १८७९ (ज्यास ह्यांत यापुढें उक्त अधिनियम असें म्हटलें आहे), यानुसार करणें असलेला कोणताहि दावा किंवा अर्ज तारीख २७ मे सन १९५० रोजीं दाखल करण्यांत आला असेल व हा अधिनियम अंमलांत येण्याच्या वेळीं अनिर्णित असेल तेव्हां, असा दावा किंवा अर्ज दाखल करणें हें, मुंबईच्या कर्जदार शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत अधिनियम, १९४७, कलम ५६ यांत कांहींहि असलें तरी उक्त दावा किंवा अर्ज, उक्त अधिनियमाची मुदत संपण्यापूर्वी दिनांक २६ मे १९५० रोजीं, यथास्थिति, दाखल करण्यांत किंवा करण्यांत आला नव्हता ह्याच मुद्यावर अवैध आहे असें समजतां कामा नये. विवक्षित अनिर्णित दावें व अर्ज वैध ठरविणें.

स्पष्टीकरण.—ह्या कलमाच्या प्रयोजनासाठीं, हा अधिनियम अंमलांत येण्याच्या वेळीं अनिर्णित असलेला दावा किंवा अर्ज या संज्ञेंत, ज्या दाव्याच्या किंवा अर्जाच्या संबंधांत हा अधिनियम अंमलांत येण्याच्या वेळीं अपील किंवा फेरतपासणी अर्ज करण्यांत आला असेल किंवा असें अपील किंवा अर्ज अनिर्णित असेल त्या दाव्याचा किंवा अर्जाचा समावेश होतो.

---

*दिनांक १५ नोव्हेंबर १९५९ पर्यंत सुधारलेला.

काढून टाकलेले विवक्षित दावें व खटले पुन्हां दाखल करणें.

३. जर ह्या अधिनियमाच्या सुरवातीपूर्वी असा कोणताहि दावा किंवा अर्ज, उक्त अधिनियमाची मुदत संपण्यापूर्वी दिनांक २६ मे १९५० रोजीं दाखल करण्यांत आला नव्हता किंवा करण्यांत आला नव्हता ह्याच मुद्यावर कोणत्याहि न्यायालयानें काढून टाकला असेल तर, उक्त न्यायालयानें ह्या अधिनियमाच्या सुरवातीपासून सहा महिन्याच्या आंत अर्ज करण्यांत आल्यास व मुंबईचा कर्जदार शेतकऱ्यांना सहाय्य देण्याबाबत अधिनियम, १९४७, कलम ५६ यांत कांहींहि असलें तरी, आपला हुकूमनामा किंवा आदेश रद्द केला पाहिजे आणि यथास्थिति, उक्त दाव्याचें किंवा अर्जाचें काम पुढें चालविलें पाहिजे.

विवक्षित अपिलें किंवा फेरतपासणी अर्ज पुन्हा दाखल करून घेणें.

४. जेव्हां अशा दाव्यांतून किंवा अर्जांतून उद्‌भवणाऱ्या कोणत्याहि अपिलांत किंवा फेरतपासणी अर्जात ह्या अधिनियमाच्या सुरवातीपूर्वी, अपील किंवा फेरतपासणी अर्ज काढून टाकणारा किंवा ज्या दाव्यांतून किंवा अर्जांतून उक्त अपील किंवा फेरतपासणी अर्ज उद्‌भवला तो दावा किंवा अर्ज उक्त अधि-नियमाची मुदत संपण्यापूर्वी दिनांक २६ मे १९५० रोजीं दाखल करण्यांत किंवा करण्यांत आला नव्हता ह्याच मुद्यावर काढून टाकणारा हुकूमनामा किंवा आदेश करण्यांत आला असेल तेव्हां, अपील न्यायालयानें किंवा उक्त अधिनियमानुसार फेरतपासणी करण्याचे अधिकार चालविणाऱ्या न्यायाधिशानें, ह्या अधि-नियमाच्या सुरवातीपासून सहा महिन्यांच्या आंत अर्ज करण्यांत आल्यास व मुंबई कर्जदार शेतकऱ्यांना सहाय्य करण्याबाबत अधिनियम, १९४७, याच्या ५६ व्या कलमांत काहीहि असलें तरी आपला हुकूमनामा किंवा आदेश रद्द केला पाहिजे व यथास्थिति, उक्त अपीलाचें किंवा फेरतपासणी अर्जाचें काम पुढें चालू केलें पाहिजे.